# INTERNATIONAL INDIAN SCHOOL, DAMMAM
## SUMMATIVE ASSESSMENT–I, 2015
## MARATHI, CLASS-VI

**TIME : 3 HRS** **MARKS : 90**

---

INSTRUCTIONS:

1. Read the questions carefully
2. Number the question correctly in your answer sheet as given in the question.

---

**Q 1. समानार्थी शब्द लिहा. (ANY 5 )** M- 5

१)गुरुजी २) झोप ३) वादळ ४) घर ५) माणूस ६) काम

**Q.2. विरुध्दार्थी शब्द लिहा. ( ANY 5 )** M- 5

१) दिवस २) आला ३) स्वच्छ ४)अर्धवट ५) खूप ६) जेवढा

**Q.3 लिंग बदला. (ANY 5)** M- 5

१) शेतकारी २) बिचारी ३) मुलगा ४)दादा ५) बाई ६) भिकारी

**Q.4. वचन बदला (ANY 5)** M- 5

१) पाटी २) वाट ३) कौल ४) रस्ता ५) धार ६) शिडी

**Q.5. खालील शब्दांचा अर्थ सांगुन वाक्यात उपयोग करा. (ANY 3 )** M- 6

१. मोलमजुरी करणे २. वादळवारा ३. संगे ४. खोळंबा करणे

**Q. 6 विराम चिन्हे घालुन वाक्य पुन्हा लिहा.** M- 3

१. शेतकरी म्हणाला अन्नच मागायच होत तर मग खाली कशाला बोलवलस

२. अस्स होय म्हणत गुरूजी पुढे निघून गेले.

३. गुरूजीनी रस्त्यावरूनच हाक मारली राजू अरे राजू

**Q.7 कोण ते लिहा.** M- 4

१. शेण आणायला शरम वाटणारा.

२. वा-याला पकडून पाहणारा.

३. अन्न मागणारा.

४. वेगात पळणारा , पाऊस घेऊन जाणारा

**Q.8. मूळ शब्दाला भर जोडून नवीन शब्द तयार करा.** M- 2

१) दिवस २) जन्म

**Q.9. शब्दार्थ लिहा.** M- 6

१) भाताचा कोंडा २) माझ्यासोबत ३) भिजून चिंब होणे ४) धारा

५) कौल ६) अंगण

**Q.10. एका वाक्यात उत्तरे लिहा.** M- 7

१) शेतकरी काय करत होता?

२) भिका-याने शेतक-याला खाली का बोलावले?

३) कवि कोणाला पकडून ठेवू इच्छित आहे?

४) वारा कोणाला घेऊन जातो?

५) वादळ वारा आपल्यासंगे काय घेऊन आला ?

६) हीराने गुरुजीना काय सांगितले?

७) पाऊस केव्हा जातो?

**Q.11. थोडक्यात उत्तरे लिहा (ANY THREE)** M- 9

१) शेतक-याने कामाचे आणि वेळेचे महत्त्व कसे पटवून दिले?

२) कवीला पावसाच्या पाण्यात काय करायचे आहे?

३) राजूची आई आजारी होती म्हणुन गुरूजीनी काय केले?

४) शेण गोळा करायला कामातून कोणत्या दोन गोष्टी साधतात?

**Q.12. कोण कोणास म्हणाले** M- 4

१) " आज राजू नाही दिसत"?

२)" शरम वाटती त्याला."

३)"अहो दादा जरा खाली उतरता का ?"

४) "मला खाण्यासाठी अन्न हवय."

**Q.13 लिहा.** M- 4

जसे : खाणे - खायला - खाण्यासाठी

१. करणे ------------ --------------

२. उतरणे ----------- -------------

३. बघणे ----------- ------------

४. जाणे ---------- -------------

**Q.14 रिकाम्या जागा भरा.** M- 5

१) हिराच्या मुलाचे नाव -------- होते.

२) पावसाळा -------- आला होता.

३) शेतक-याचे त्याच्याकडे ----------- नव्हते.

४) त्या मानसाने शेतक-याला मोठयाने ------------ मारली.

५) --------- विकून स्वत:चे आणि पोराचे पोट भरत असे.

**Q.15 चुक कि बरोबर लिहा.** M- 5

१) हिरा दिवसभर शेण गोळा करे.

२) शेतकरी शिडीवरुन खाली उतरला नाही.

३) राजूची आई शेतात काम करीत असे.

४) शेतक-याने भिका-याला जेवन दीले.

५) राजूची आई गावातील शेण गोळा करून गोव-या ठापून विकत असे.

**Q.16 खालील कविता वाचून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.** M- 5

जे देशासाठी लढले ,
ते अमर हुतात्मे झाले ॥
सोडीले सर्व घरदार ,
सोडिला सुखी संसार,
ज्योतेसम जीवन जगले,
ते अमर हुतात्मे झाले .
तो तुरूंग, ते उपवास,
सोसला किती वनवास!
कुणि फासावरती चढले,
ते अमर हुतात्मे झाले .
झगडली , झुंजली जनता,

मग स्वतंत्र झाली "माता",
हिमशिखरी ध्वज फडफडले,
ते अमर  हुतात्मे झाले .
हा राष्ट्रध्वज साक्षीला,
करु आपण वंदन याला,
जयगीत गाऊ या अपुले,
ते अमर हुतात्मे झाले .देश

प्रश्न :

१. कोण देशासाठी लढले?
२. अमर हुतात्मेनी काय सोडले ?
३. कोण  झगडली झुजली?
४. आपण काय गायला हवे?
५. विरोधी शब्द लिहा.  १. जीवन   २. देश

**Q.17  खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्त्तरे लिहा.**  **(COMPREHESION)** M-5

गणेशचतुर्थीच्या दिवशी गावाला अहमदभाईची गुलाबाची बाग खुली असते. कित्येकांच्या घरी अहमदभाई गुलाबांची फुले घेऊन स्वत: जात आणि आपल्या  नोकराला बजावून ठेवतात , "गावतल्या प्रत्येक घरी आपल्या बागेतले गुलाब पोहोचले पाहिजेत. बाग खुदाची आहे". अहमदभाई आपल्या गुलाबांच्या बागेत दिवसभर मग्न असतात. ऐखादे रोपटे एखादया दिवशी फुलले नाही, तर ते चर्चित होतात . त्यांचा चेहरा त्या दिवशी उतरलेला असतो.

प्रश्न:

१. अहमदभाईच्या बागेत कोणती फुले फुललेली होती?
२. कोणत्या दिवशी अहमदभाईची बाग सर्वानां खुली असते?
३. अहमदभाई दिवसभर कोठे मग्न असत?
४. अहमदभाईचा चेहरा केव्हा उतरलेला असे?
५. या उता-याला योग्य शिर्षक दया?

**Q.18. निबंध लिहा.** माझा आवडता नेता / देशभक्त M- 5